महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१७ वा | दिनांक : १६/१०/२०२५ | वार : गुरूवार

## शरद पवारांचा दिवाळी पाडवा यंदा नाही : सणावर पूरसंकटाची काळी छाया



**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यंदा दिवाळी साजरी करणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्रातील पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. या संदर्भात शरद पवारांनी एका परिपत्रकाच्या माध्यमातून यंदाची दिवाळी साजरी करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या पत्रकानुसार, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मभूषण शरदचंद्र पवार साहेब हे दरवर्षी दीपावली पाडवा सणानिमित्त बारामती येथील गोविंदबाग येथे त्यांच्या निवासस्थानी जनता व कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा स्वीकारण्यासाठी उपलब्ध असतात. परंतु, यावर्षी दीपावली पाडवा सणानिमित्त शरद पवार गोविंदबाग किंवा अन्य ठिकाणी उपस्थित राहणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

दरवर्षी पाडव्याच्या दिवशी राज्यभरातील राजकीय नेते, आमदार, खासदार, उद्योगपती आणि सामान्य नागरिक बारामतीत येऊन पवार कुटुंबाला शुभेच्छा देतात. बारामतीतील गोविंदबागेत पवारांचे पारंपरिक स्वागत केले जाते आणि याच दिवशी अनेक राजकीय चर्चाही रंगतात. परंतु, यंदा दिवाळी साजरी केली जाणार नाही.

महाराष्ट्रात यंदाच्या पावसाळ्यात मराठवाड्यासह राज्याच्या अनेक भागांमध्ये पूर परिस्थिति निर्माण झाली. या अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या शेतात अक्षरशः तलाव तयार झाले होते आणि पिके वाहून गेली होती. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उघड्यावर पडले. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाकडून अतिवृष्टी बाधित कुटुंबीयांना मदत देखील देण्यात आली.

शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली होती. यावेळी बोलताना पवारांनी अतिवृष्टीच्या संदर्भात भाष्य केले होते. ते म्हणाले होते की, अतिवृष्टी संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे, ती तुटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येऊन पाहणी केली पाहिजे होती. आमच्या वेळेस केंद्रीय पथक येऊन पाहणी करून भरगोस मदत देत होते. नरसिंह राव जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा ते राज्यात अतिवृष्टीच्या पाहण्यासाठी येणार होते. पण, तेव्हा मीच त्यांना पाहण्यासाठी येऊ नका असे म्हटले. कारण, शासकीय यंत्रणा तुमच्या दौऱ्यासाठी लागेल, त्यामुळे मदतही होणार नाही, असे त्यांनी म्हटले होते.

## मतदान गोपनीय असते, मतदार यादी गोपनीय कशी? : राज ठाकरे

**मुंबई :** राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. काल वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने आज पुन्हा एकदा विरोधकांच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाची राज्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक मुख्य अधिकाऱ्यांसोबत सुमारे तासभर बैठक झाली.

या बैठकीत ठाकरे बंधूंनी निवडणूक अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. व्हीव्हीपॅट नसेल तर बॅलेटवर निवडणुका घ्या, अशी मागणी ठाकरे बंधूंनी आयोगाकडे केली. तर मतदार याद्यांमधील घोळावरून शेकापचे जयंत पाटील चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले.

निवडणूक याद्यांमध्ये घोळ आहेत. हे घोळ आम्ही राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींसमोर ठेवलेले आहेत. ते सुधारले पाहिजेत. ते सुधारून विरोधीपक्षाचे समाधान झाले पाहिजे. सत्ताधारी पक्षांचेही समाधान झाले पाहिजे. जे निवडणुका लढवतात, त्या राजकीय पक्षांचे समाधान झाल्याशिवाय आयोगाने निवडणुका घेऊ नयेत, ही आमची रास्त मागणी आहे. यात काहीच गैर नाही. निवडणूक आयोगाने या गोष्टींचा विचार करावा. त्यामध्ये इतर वेगवेगळे कायदे आणूच नयेत. ही सोपी गोष्टी आहे. त्यात काही कॉम्प्लिकेटेड नाहीये. आम्ही क्लिष्ट विषय बोलत नाहीयेत, असे राज ठाकरे म्हणाले.

मतदार याद्यांमधील घोळ निवडणूक आयोगासमोर ठेवल्यानंतर मला असे वाटते, ते आणि राजकीय पक्षांनी मिळून या याद्या सुधारल्या पाहिजेत. याद्या सुधारूनच निवडणुकांना सामोरे गेले पाहिजे. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत 232 जागा महायुतीच्या निवडून आल्यात. एवढ्या जागा निवडून आल्यानंतर देखील संपूर्ण महाराष्ट्रात सन्नाटा होता. जो जल्लोष व्हायला पाहिजे होता, तो नव्हता. हे कसले द्योतक आहे. निवडणुकीत पडलेल्यांना धक्का बसतोच, पण निवडून आलेल्यांना सुद्धा धक्का बसावा, ही कोणती निवडणूक आहे? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

मतदार याद्या गोपनीय असतात, असे निवडणूक आयोगाने आम्हाला सांगितले. पण मला वाटतं मतदान गोपनीय असते ना? मतदार कसा गोपनीय असेल? दुसरी गोष्ट मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावता आणि 45 दिवसांनंतर त्यांचे फुटेज डिलीट करता. जर निवडणूक आयोग बघू शकतो, तर आम्ही नाही का बघू शकत? निवडणूक आयोगाला निवडणुका लढवायच्या नाहीत, त्या आम्हाला लढवायच्या आहेत. निवडणूक आयोग लपवा-छपवी का करतंय? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. राजकीय पक्षांना जर निवडणूक आयोग मतदार याद्या दाखवतच नसेल तर मला वाटतं की पहिला घोळ इथे आहे, असेही राज ठाकरे म्हणाले.

## पुरावे असतील, तर आयोगाकडे द्या, आरोप बोलण्यापुरते नको : अजित पवार



**मुंबई :** आपल्या बोलण्यामुळे कुठलाही समाज नाराज होणार नाही, ही खबरदारी आपण घेतली पाहिजे. आपण शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेतो, तेव्हा त्या विचारांना साजेसे आचरणही आवश्यक आहे, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी व्यक्त केली. ते आज पक्षाच्या नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, आपण जेव्हा कुठल्या समाजावर अन्याय होऊ देणार नाही, असे सांगतो, तेव्हा कोणताही समाज नाराज होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. प्रत्येक समाजात आपले कार्यकर्ते आहेत, सर्वांना बरोबर घेऊन जाणे हीच खरी प्रगती आहे. आमदार संग्राम जगताप यांच्याबाबत विचारले असता पवार म्हणाले, त्या संदर्भात आम्ही त्यांना नोटीस बजावली आहे. त्यांनी त्या नोटीसीला उत्तर द्यावे, ते आले की पुढे पाहू.

### लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याची माहिती देताना अजित पवार म्हणाले, दर मंगळवारी आम्ही आमदार, नेते आणि मंत्र्यांना बैठकीसाठी बोलावतो. मात्र आता दर महिन्याला एकदा सर्व जिल्ह्याध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांची बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या पद्धतीने आज बैठक झाली. पुढील निवडणुकांसाठी तयारी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अलीकडच्या काळात राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल झाले आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणे आणि त्यांच्या अडचणी सोडवणे, हा आमचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले.

### पूरग्रस्त भागासाठी मदतीवर लक्ष ठेवा

अजित पवार यांनी पूरग्रस्त भागातील मदतीचा उल्लेख करताना सांगितले, सरकारने मदत जाहीर केली आहे. मात्र ती मदत प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेपर्यंत स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. ते म्हणाले की, आज सुनील तटकरे यांचा वाढदिवस असल्याने त्यांना लवकर जायचे होते, पण इतर सर्व नेत्यांनी विविध प्रश्न मांडले. त्यावर आम्ही उत्तरे दिली. मंत्रिमंडळ बैठकीबाबत बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, ज्या जिल्हाधिकाऱ्यांचे प्रस्ताव मदत आणि पुनर्वसन खात्याकडे आले आहेत, त्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला आहे. आर्थिक तरतूद करून ठेवली असून ज्या ठिकाणी गरज आहे, तिथे निधी पोहोचवण्यात येईल. तसेच त्यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या बोनस संदर्भात सांगितले, बोनस द्यायचा होता तो निर्णयही सरकारने घेतला आहे.

### महाराष्ट्रातील निवडणुका पारदर्शक असतात

विरोधकांनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांबाबत अजित पवार म्हणाले की, आपल्या महाराष्ट्रात नेहमीच निवडणुका पारदर्शकपणे झाल्या आहेत. आरोप करणे आणि प्रत्यक्षात असणे यात फरक आहे. आरोपांमध्ये तथ्य असावे, तेव्हा त्यावर चौकशी होते. आयोग त्या संदर्भात शहानिशा करेल. ते म्हणाले की, एका मतदाराचे नाव एका ठिकाणी असेल तर तो दुसरीकडे मतदान करू शकत नाही. पूर्वी काही ठिकाणी शहरात आणि गावी दोन्ही ठिकाणी मतदान करण्याची प्रथा होती, पण तो काळ गेला. आता यंत्रणा अत्यंत पारदर्शक आहे. पवार यांनी सर्वांना सल्ला दिला की, या निवडणूक प्रक्रियेचा वापर प्रामाणिकपणे केला पाहिजे. जर कुणाकडे ठोस पुरावे असतील, तर ते आयोगाकडे द्यावेत. आरोप फक्त बोलण्यापुरते राहू नयेत.

### विरोधकांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा अधिकार

विरोधकांनी अलीकडे निवडणूक आयोगाशी घेतलेल्या भेटीबाबत विचारले असता अजित पवार म्हणाले की, लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. विरोधकांनी आपले मुद्दे मांडले आहेत, निवडणूक आयोग त्यांना योग्य उत्तर देईल. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या भूमिकेबाबत विचारल्यावर अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाला कोणाच्या बरोबर जायचे, हे ठरवण्याचा अधिकार आहे. तुम्ही हे प्रश्न राज ठाकरे यांनाच विचारा; ते त्याचं समर्पक उत्तर देतील. अजित पवार यांनी आजच्या विधानांमधून स्थानिक स्वराज्य निवडणुका, समाजात सौहार्द राखणे, पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि प्रशासनातील कार्यक्षमतेचा संदेश दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५


## मनुस्मृती दहनासह अनिल मिश्रा आणि राकेश किशोर यांच्या प्रतिमांचे दहन






**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आज जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद क्रांती चौकात मनुस्मृतीचे दहन करून सामाजिक न्याय, समानता आणि मानवतावादाच्या घोषणां देत जोरदार आंदोलन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भारतीय राज्यघटना आणि न्यायसंस्थेवर होत असलेल्या अपमानजनक आणि द्वेषपूर्ण हल्ल्यांविरोधात ग्वालीयर येथील ऍड. अनिल मिश्रा आणि दिल्ली येथील ऍड. राकेश किशोर तिवारी यांच्या प्रतिमांना जोडे मारून दहन केले.ग्वालीयर येथील वकील ऍड. अनिल मिश्रा यांनी नुकतेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटनेविरोधात अत्यंत घृणास्पद आणि जातीवादी विधान केले होते. त्यांच्या वक्तव्याने देशभरात तीव्र संताप उसळला असून सामाजिक संघटनांकडून त्यांच्यावर कठोर कारवाई व देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.तर दुसऱ्या घटनेत, दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात ऍड. राकेश किशोर तिवारी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करून न्यायव्यवस्थेचा आणि घटनात्मक संस्थांचा अपमान केला. या कृतीविरोधात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाने तीव्र निषेध व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी"अनिल मिश्रा आणि राकेश किशोर यांना अटक करा!""संविधानाचा अपमान करणाऱ्यांना देशद्रोही ठरवा!"अशा जोरदार घोषणा दिल्या.या प्रसंगी "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आणि राज्यघटनेचा अपमान सहन केला जाणार नाही. समाजात जातीय विष पसरवणाऱ्यांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल न केल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल." असा इशारा देण्यात आला.

आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे, जिल्हासंघटक रतन जाधव, बापूसाहेब चाबुकस्वार, रमेश दादा उमप, मंगेश सोनवणे प्रकाश सोनवणे साहेबराव सोनवणे ज्ञानेश्वर माळी रमेश पवारकिरण गायकवाडनरेश माळीविशाल सोनवणे भावड्या सोनवणे आदिनाथ सोनवणे भगवान माळी सोहम माळीरोहित गायकवाड सोमनाथ सोनवणेविष्णू पवार बाजीराव सोनवणे सागर पवार विजू सोनवणे बाळू खरात प्रमोद तायडे संजय गायकवाड रवी दाभाडे मनोज पगारे राजेश बागुल रावसाहेब गवळीबंडू पोटफोडेबंडू तांदळे विनोद सदावर्ते दीपक गायकवाडसुरेश जाधव किरण नाडे यांनी कले.

## प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे 'वाचन प्रेरणा दिन' व 'आंतरराष्ट्रीय हात धुवा दिन' उत्साहात साजरा




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** प्राथमिक व माध्यमिक शाळा उंबरखेडा येथे दिनांक 15 ऑक्टोबर 2025 रोजी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात वाचनाची गोडी लागावी, वाचन केल्यामुळे माणूस सुसंस्कारित होतो , वाचनामुळे बुद्धीचा व चारित्र्याचा विकास होतो याविषयी शाळेचे मुख्याध्यापक प्रविण शि दे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पांडुरंग सुपेकर यांनी मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या विषयी माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय जोपासावी असा मोलाचा संदेश दिला व आंतरराष्ट्रीय हात धुवा दिन साजरा करण्यात आला शाळेतील विद्यार्थ्यांना हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. स्वच्छतेचे महत्व सांगण्यात आले.यावेळी मनोज रायसिंगे , प्रदीप पवार , फुरकान शेख , लक्ष्मण गझलवाड , चंद्रकांत बामणीया , अतुल दसोडे , लक्ष्मण मंचरे सर्व शिक्षक वृंद व अंशकालीन निदेशक प्रवीण राठोड धनंजय अहिरे अंकुश राठोड उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग सुपेकर यांनी केले. उमेश हुकुमदार यांनी आभार मानले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नव्याने बिनव्याजी २०० कोटी रुपयाचे सॉफ्टलोन मंजूरचे निवेदन बापूराव पाटील यांनी प्रवीण दरेकर यांच्याकडे सुपूर्द...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले )** ता. १५. जिल्हा बँकेस शासकीय भागभांडवल ७४ कोटी रुपये मिळावेत, तेरणा व श्री तुळजाभवानी कारखान्यांसाठी शासनाने घेतलेल्या हमीची २४२ कोटी रुपये, २०२१-२२ चे ९५६.१९ लाख रुपये बँकेस द्यावेत, तेरणा व श्री तुळजाभवानी कारखान्याकडील जमीन-विक्री करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी, अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अडचणीतील शेतक-यांना नव्याने कर्ज वितरण करण्यासाठी खास बाब म्हणून बँकेस बिनव्याजी २०० कोटी रुपयाचे सॉफ्टलोन मंजूर करावे, अशी मागणी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांनी प्रवीण दरेकर यांच्याकडे केली आहे. अशी माहिती राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांची जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील यांनी सोलापूर येथे भेट घेऊन जिल्हा बँकेला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी निवेदन दिले. यामध्ये जिल्हा बँकेने शासकीय भागभांडवल ७४ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे दाखल केलेला असून सदर प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. सदर प्रस्ताव मंजूर करुन बँकेस शासकीय भागभांडवल ७४ कोटी रुपये मिळावेत. तेरणा व श्री तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्यांना कर्जवाटप करतेवेळी शासनाने घेतलेल्या हमीपोटीची रक्कम २४२ कोटी रुपये शासनाकडून येणे असून सदरची रक्कम बँकेस तात्काळ मिळावी. सन २०२१-२२ चे पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान ३ टक्केची रक्कम ५१८.५६ लाख व २.५० टक्केची रक्कम रुपये ४६७ .६३ लाख अशी एकूण ९५६.१९ लाख रुपये रक्कम शासनाकडून न मिळाल्यामुळे शासनाकडे याबाबतीत पुर्नविचार याचिका देखील दाखल केली असून ती प्रलंबित आहे. सदर याचिका निकाली काढून सदर रक्कम बँकेस प्राप्त झाल्यास काही प्रमाणात बँकेस आर्थिक दिलासा मिळु शकतो. भाडेतत्वावर दिलेल्या तेरणा व श्री तुळजाभवानी शेतकरी साखर कारखान्याकडील जमीन विक्री करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी. जेणेकरून बँकेस पुर्वपदावर येण्यासाठी मदत होईल. तसेच या क्षेत्रावर जी शासनाची विविध देयकामधून सवलत मिळण्यासाठी शासन दरबारी बैठक घेऊन यावर योग्य तो मार्ग काढण्यात येईल. धाराशिव जिल्हामध्ये सध्या अतिवृष्टी जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक विवंचनेमध्ये सापडलेला आहे. सदर शेतक-यांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी नव्याने कर्ज वितरण करणे आवश्यक आहे. सध्या जिल्हा बँकेकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे सदर शेतक-यांना बॅंक कर्ज वितरण करण्यास सक्षम नाही. तेव्हा खास बाब म्हणून या बॅंकेस बिनव्याजी २०० कोटी रुपयाचे सॉफ्टलोन मंजुर करावे, अशी मागणी केली आहे. याप्रसंगी दरेकर यांनी पुढील आठवड्यात बैठक बोलावून जिल्हा बँकेला शासन स्तरावरुन आवश्यक ते अर्थसहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५


## ट्रायबल डॉक्टर फोरम महाराष्ट्र राज्य च्या अध्यक्षपदी डॉ पुना गांडाळ यांची नियुक्ती



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** दिनांक ११ व १२ ऑक्टोबर या दोन दिवशीय सम्मेलनात “घाटघर इकोसिटी” ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथे आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे व त्यांचे अंगरक्षक राया ठाकर यांचे भूमित, महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखर, भंडारदरा धरण परिसरातील निसर्गरम्य वातावरणात TDF (महाराष्ट्र राज्य) स्नेहसंमेलन संपन्न झाले.त्या संम्मेलनात डॉ पुना गांडाळ यांची ट्रायबल डॉक्टर फोरम महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली नाशिक व अकोले TDF सदस्य यांच्या टीमने नियोजनात पुढाकार घेत या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते.स्नेहसंमेलन आणि TDF संघटनेची सर्वसाधारण सभा (GBM) अत्यंत खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. TDF सदस्य व अकोले तालुक्याचे विद्यमान लोकप्रिय आमदार मा. डॉ. किरण लहामटे यांनीही त्यांचा अमूल्य वेळ देऊन स्नेहसंमेलनास उपस्थिती नोंदविली.त्यांनी TDF संस्थेच्या कामकाजाची प्रशंसा करीत पुढील आव्हाने व दिशा याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच TDF सोबत राहून TDF साठी यापुढेही सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या संमेलनास डॉक्टर सदस्याव्यतिरिक्त सेवानिवृत्त सहसचिव आदरणीय मा. श्री सदानंद गावित साहेब, सेवानिवृत्त उपायुक्त मा. श्री. मुकणे साहेब, मा. RFO श्री. गावित साहेब, तसेच सेवानिवृत्त उपसंचालक मा. अॅड श्री. राजाराम बेंडकोळी साहेब, श्री. अनिस तडवी, डॉ. पंडित सोनकांबळे तसेच वैद्यकीय शिक्षण घेत असलेले काही विद्यार्थी यांचेसह इतरही अनेक मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीस आदिवासी क्रांतिवीरांच्या प्रतिमापूजन, मयत झालेल्या तरुण डॉक्टर्सना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली. नंतर सर्व उपस्थित मान्यवरांचे, सदस्यांचे स्वागत, लव्हाळवाडी येथील उत्तम आदिवासी कांबड नृत्य व महिलांचे टाळी नृत्य (फुगडी नाच) झाल्यानंतर TDF चा स्थापनेपासून आजवरचा प्रवास आणि संघटनेमार्फत केलेली आजवरची वाटचाल, ठळक घटना, केलेली महत्वाची कामे, आदिवासी वरील होणाऱ्या अन्यायाविरुद्ध विविध आंदोलनातील पाठिंबा, आजवरील TDF चे यश, डॉ. दिलीप बांबळे केस चा ऐतिहासिक कोर्ट निर्णय,TDF मार्फत सुरू असलेले कोर्ट केसेस लढे, आदिवासी भागात घेत आरोग्य शिबिरे व इतर आजवरील संघटनेची वाटचाल याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये TDF चे प्रमुख शिलेदार व TDF अध्यक्ष, माजी सेवानिवृत्त अधीक्षक कमला नेहरू हॉस्पिटल, पुणे व ज्येष्ठ मार्गदर्शक मा. डॉ.रामकृष्ण पेढेकर साहेब, TDF उपाध्यक्ष व प्रख्यात युरोलॉजिस्ट डॉ.विलास साबळे, डॉ. प्रमिला बांबळे मॅडम, सचिव डॉ. संतोष सुपे यांनी TDF संस्थेची वाटचाल व आव्हाने याबाबत मोलाची माहिती दिली. संमेलनात मोठ्या संख्येने नंदुरबार, धुळे, नाशिक,छत्रपती संभाजीनगर,नांदेड, हिंगोली, अहिल्यानगर, मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी ठिकाणाहून मोठ्या संख्येत सर्व विविध वैद्यकीय शाखेचे आदिवासी डॉक्टर्स उपस्थित होते. त्यांनी त्यांची मनोगते व आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक महत्वाच्या सूचना दिल्या. सर्वांनीच मनोगतात Payback to Society आणि उबंटू, Let's Do Together या प्रमुख तत्त्वानुसार आणि "समाज आहे म्हणून मी आहे", ही जाणीव असल्याचे व्यक्त केली. महाराष्ट्रातील आदिवासी ४५ अनुसूचित जमातीतील उच्च शिक्षित, बुद्धिवादी लोकांनी एकत्र येत समाजोपयोगी व भावी युवा पिढीसाठी मार्गदर्शक असे काम करणे काळाची गरज ओळखून त्यासाठी सामूहिक प्रयत्न केले पाहिजे. तरच आपली आदर्श अशी मुळ आदिवासी संस्कृती टिकेल.आदिवासी जिल्ह्यांमध्ये सर्व सदस्यांनी आदिवासी संस्कृती संवर्धन बाबत ठोस भूमिका निभावून आपले अस्तित्व टिकवणे गरजेचे आहे, यावर एकमत झाले. तसेच सर्वात महत्वाचा मुद्दा मुळ आदिवासींमध्ये सधन प्रगत इतर जातींची प्रचंड संख्येत बोगस घुसखोरी असून होत असून या बोगस घुसखोरीचा प्रतिबंध सर्वांनी एकत्र येऊन केला पाहिजे. या घुसखोरीचे दुष्परिणाम प्रामुख्याने वैद्यकीय, इंजिनियरिंग, IIT या व्यावसायिक शिक्षणात,UPSC, MPSC स्पर्धात्मक परीक्षांमध्ये तसेच नोकरभरती दिसून येत आहे.बोगस घुसखोरीमुळे शिक्षण व नोकरीतील कधीही भरून न येणारे नुकसान होत असून या घुसखोरीमुळे अनधिकृत असंवैधानिक प्रणाली वापरत जंगल,जल जमिनी खरेदी-विक्री व्यवहार होत आहे आदिवासींचे घटनात्मक अधिकारांवर आलेले गंडांतर या सर्व गंभीर बाबी घडत आहेत. शिक्षण व नोकरी मध्ये सशर्त जात वैधता प्रमाणपत्र व कोर्टाचे आदेशाची अवमान करत यासारख्या अनेक असंवैधानिक बाबींवर तत्काळ कोर्ट स्तरावर लढा उभारणे अत्यंत गरजेचे असल्याने TDF मार्फत विविध प्रकरणात हस्तक्षेप याचिका दाखल करणे गरजेचे आहे. काही प्रकरणात त्या दाखलही झालेल्या आहेत. या बोगस घुसखोरीवर सर्वांनी जागृत राहून सर्वतोपरी एकत्रित लढा उभारणे गरजेचे आहे.या TDF स्नेहसंमेलनात कार्यक्रम पत्रिकेनुसार अहवाल वाचन व काही महत्वाचे ठराव देखील सर्वानुमते घेण्यात आलेले आहेत.तूर्त त्यातील एक ठराव संघटनेची मुळ घटनेतील नमूद केलेल्या तरतुदी / नियमानुसार नवीन कार्यकारणीची सर्वानुमते निवड करण्यात आलेली आहे.ती खालिलप्रमाणे - जुन्या TDF घटनेनुसारच सद्यस्थितीत ही ११ सदस्य असलेली नवीन TDF कार्यकारणी 2025 विहित मार्गाने निवड करण्यात आलेली आहे अध्यक्ष डॉ.पुना गांडाळ उपाध्यक्ष डॉ.विलास साबळे सचिव डॉ.यशवंत गभालेसहसचिव डॉ.नितीन रावते खजिनदार डॉ.विष्णू बुळे सदस्या डॉ.वैशाली गायकवाड सदस्य डॉ.रामचंद्र मुरमुरेसदस्य डॉ.पुरुषोत्तम मडावीसदस्य डॉ.पंकज जाधव सदस्य डॉ.वामन गेंगजे सदस्य डॉ शिवाजी भिसे वरील नवीन कार्यकारणीमध्ये गरजेनुसार बदल करण्याचा अधिकार व काही विभागीय स्तरावरील सदस्य निवड करण्याचा अधिकार कालच्या सभेत अध्यक्षांना दिलेले आहेत सर्वांनी आपला बहुमोल असा अमूल्य वेळ देत, तन- मन- धन स्वरूपात मदत करत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. तसेच या अतिदुर्गम भागात निसर्गाचा आस्वाद घेत नयनरम्य वातावरणात झालेल्या ऐतिहासिक TDF स्नेहसंमेलनात सहभाग नोंदविल्या बद्दल सर्वांचे डॉ पु.ना गांडाळ यांनी पुनश्च आभार मानले.

## डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती 'पुस्तक वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. प्रारंभी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे संचालक श्री. मल्लिनाथ दंडगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राम सोलंकर, डॉ. आर. एस. रामशेट्टी, प्रा. आर.पी. जकाते, प्रा. तात्याराव चव्हाण, प्रा. रवींद्र जोजन, डॉ. लक्ष्मण बिराजदार, प्रा. पी. डी. कांबळे, प्रा. सुबोध कांबळे, प्रा. ग्रंथपाल अखिल शेख यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर महाविद्यालयातील सर्वच वर्गामध्ये व ग्रंथालयात दिवसभर विद्यार्थ्यांनी विविध ग्रंथांचे वाचन केले. यात इयत्ता ११ वी ते पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी ,प्राध्यापक ,कर्मचारी सहभागी झाले होते. अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे यांच्याबरोबरच विविध संतांचे साहित्य, कथा ,कादंबऱ्या , कविता यांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५


## मनुष्य जीवनात बुध्दाच्या शिकवणीचे आचरण आणि मनाच्या शुध्दतेसाठी ध्यान गरजेचे : पूज्य भदंत डॉ. पोरनचाई पावलधम्मो पिन्यापोंग



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : मनुष्य जीवनात बुध्दाची शिकवणीचे आचरण आणी मनाच्या शुध्दतेसाठी ध्यान गरजेचे - भारत हा विविधतेने नटलेला देश आहेत कार्यक्रमात सर्व समाजाचे लोक येथे येऊन कार्यक्रमात सहभागी झाले पूज्य भदंत डॉ. पोरनचाई पावलधम्मो पिन्यापोंग.

दौलताबाद येथे वर्ल्ड अलायन्स ऑफ बुध्दिस्ट, थायलंड व संबोधी अकादमी, महाराष्ट्रच्या वतीने मोफत देण्यात आलेल्या तथागत भगवान बुध्द मुर्तीचा (बुध्दरुप) स्थापना कार्यक्रम येथेआयोजित करण्यात आला होता. दौलताबाद येथील भिमनगर येथील बुध्द विहार येथे वर्ल्ड अलायन्स ऑफ बुध्दिस्ट, थायलंड व संबोधी अकादमी महाराष्ट्रच्या वतीने मोफत देण्यात आलेल्या तथागत भगवान बुध्द मुर्तीचा (बुध्दरुप) स्थापणा कार्यक्रमाच्या उद्घाटन पूज्य भदंत फ्रामहा प्रपत जिरावांगसो जिरापोंगमत्ते धम्मकाया फाऊंडेशनचे संस्थापक , पूज्य भदंत डॉ. पोरनचाई पावलधम्मो पिन्यापोंगअध्यक्ष, वर्ल्ड अलायन्स ऑफ बुद्धिस्ट, थायलंडमा. किटुन्या सिरिखमसमन्वयक, थायलंड-इंडिया पिलग्रीमेज टूर्स, वर्ल्ड अलायन्स ऑफ बुद्धिस्ट..डॉ. मिथीला चौधरी (बांग्लादेश) जॉईट सेक्रेटरी जनरल, वर्ल्ड अलायन्स ऑफ बुद्धिस्ट.डॉ. भीमराव हत्तीअंबीरे बैध्द महासघ अध्यक्ष , दौलताबाद चे सय्यद लाईकोदिन, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदयस, आजी माजी पदाधिकारी उपासक, उपासिका आदी उपस्थित होते..

यावेळी पूज्य भदंत डॉ. पोरनचाई पावलधम्मो पिन्यापोंग या मार्गदर्शन करताना थायलेड भाषेत केले त्याचे हिदी मधे अनुवाद भाषातर हे मिथीला चैधरी यानी केले या वेळी त्यानी सांगितले कि जिवनात बुध्द आले त्याचे जिवन शुद्ध होते . म्हणजे बुध्दाची शिकवण जीवनात आचरणात आणली तर जिवन हे शुद्ध होते .आणी मनाच्या शुद्धतेची साठी नित्य ध्यान करणे गरजेचे आहे.

या वेळी भिमराव हत्ती हबीरे यानी सागितले कि दौलताबाद हि डाक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भुमी आहे आणी या भुमी मधे गौतम बुध्दाचे मोठे बुध्द रुप आसावे या भावणे तुन थायलंड येथील वर्ल्ड अलायन्स ऑफ बुध्दिस्ट, थायलंड व संबोधी अकादमी, महाराष्ट्रच्या वतीने विना मुल्य बुध्द रुप आज या दौलताबाद च्या भीमनगर येथील बुद्ध विहारा मधे स्थापित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या आधी बुध्दरुप मुर्तीचे दौलताबाद येथे मिरवणुक काढण्यात आली या वेळी दौलताबाद परिसरात अनुयायी ,सर्व उपसाक उपासिका समाजातील नागरिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती उत्साहात साजरी




**लाडसावंगी** : 15 ऑक्टोबर रोजी पी.एम.श्री जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी.ता.जि.छ.संभाजी नगर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाइलमॅन डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन ,श्री शिवराज मोहिते श्री अमोल सोनटक्के यांच्या हस्ते सर्व शिक्षकवृंद तथा सन्माननीय गावकरी यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून डॉ. कलाम यांना अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी विज्ञान शिक्षिका श्रीमती सारीका जैन यांनी या थोर शास्त्रज्ञाच्या जीवनचरित्राविषयी माहिती सांगितली.इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यीनी कु.दिव्या पडूळ आणि आदिती मखरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना सुंदर कवितेच्या माध्यमातून डॉ.कलाम यांचे वर्णन केले.विद्यार्थी दिनानिमित्त मा.मुख्याध्यापक श्री नजन यांच्या हस्ते विद्यार्थांना पुस्तक देउन त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन केले.श्री सचिन धस यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक समीक्षण याबद्दल माहिती सांगितली.श्री उत्तम कोळेकर यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली.

यामध्ये विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसादात प्रश्नमंजुषा संपन्न झाली.त्याचबरोबर आज जागतिक हात धुवा दिनानिमित्त विज्ञान शिक्षिका श्रीमती सारीका जैन तथा हेल्थकेयर शिक्षक श्री चव्हाण यांनी हाताची स्वच्छता आणि आरोग्य याचे महत्त्व आणि हात धुण्याच्या पायर्‍या प्रात्यक्षिकासह दाखवले.

श्रीमती वंदना घुगे,श्री अवचार यांनी हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. शाळेतील कार्यानुभव शिक्षक श्री बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात मुलांनी सुंदर आकाशकंदीलांचे प्रदर्शन भरवले.






## इकरा पब्लिक शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा





**जळगाव** : १५ ऑक्टोबर २०२५डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस शासनाच्या वतीने ‘वाचन प्रेरणा दिन’म्हणून साजरा केला जातो.वाचन हे ज्ञानार्जनाचे एक साधन आहे. तसेच वाचन ही जीवनभर पुरणारी शिदोरी आहे.

अशा या वाचनाचे महत्त्व सांगणारा ‘वाचन प्रेरणा दिन’ इकरा पब्लिक शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने शाळेत सकाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ७ वीच्या विद्यार्थिनींनी कवितांचे काव्य गायन सादर केले. शाळेचे ज्येष्ट शिक्षक श्री. आरीफ खान सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या प्रभावी वक्तृत्वातून त्यांनी वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून दिले.

पठाण वाजिद यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याविषयी माहिती मनोगतातून व्यक्त केली. शफीक अन्सारी सरांनी आपल्या जीवनात वाचन किती महत्त्वपूर्ण आहे आणि आपल्याला किती समृद्ध करणारे असते हे सांगितले.साजीद खान यांनी अतिशय सुंदर फळा लेखन केलं.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरीफ सरांनी केले. रोजमीन खान यांनी आभार मानले.

तसेच विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात विविध पुस्तकांच्या वाचनाचा आनंद घेतला. या कार्यक्रमासाठी नेहमीप्रमाणेच पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सांस्कृतिक विभागाचेही बहुमोल मार्गदर्शन लाभले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५


## वाढत्या हृदयविकाराच्या आपत्कालीन स्थितीत सीपीआर प्रशिक्षण जीवनदायी ठरेल - डॉ. निलेश महामुनी





**उमरगा :** सध्याच्या ताणतणावपूर्ण जीवनशैलीमुळे हृदयविकाराचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, अशा परिस्थितीत सीपीआर (Cardio Pulmonary Resuscitation) प्रशिक्षण ही काळाची गरज बनली आहे. हृदयविकाराचा झटका आल्यावर त्वरित दिलेले सीपीआर उपचार रुग्णाला नवजीवन देऊ शकतात, असे प्रतिपादन डॉ. निलेश महामुनी यांनी केले.

मंगळवार दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रोटरी क्लब, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने "सीपीआर प्रशिक्षण कार्यशाळा" आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. निलेश महामुनी आणि डॉ. शशी कानडे उपस्थित होत्या. व्यासपीठावर रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे, सचिव राजू जोशी, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भरत शेळके तसेच प्रा. रंजना चोचंडे, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा. परमेश्वर चव्हाण, प्रा. ज्योती जोगदाबगे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, "सीपीआर प्रशिक्षण हे प्रत्येकाने आत्मसात करणे गरजेचे आहे. आपत्कालीन परिस्थितीत ते जीवन वाचविणारे ठरते," असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. शशी कानडे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. अनिल देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी केले.






## मराठी भाषा, ग्रंथालय विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन साजरा





**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे मराठी भाषा व ग्रंथालय विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा वाढदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी व वृध्दिंगत करण्यासाठी उपस्थित सर्वांना विविध विषयावरील एक पुस्तक प्रत्यक्ष भेट देण्याची अभिनव संकल्पना प्रत्यक्षात राबविण्यात आली,उपस्थित सर्वांना एक एक पुस्तक परमप्रीतीने नजर करण्यात आले. "खरे तर आज वाचनसंस्कृती नष्ट होत चालली आहे. मानवी मन समृद्ध करण्यासाठी व समाजाला उन्नत करून संस्कृतीच्या जोपासनेसाठी आणि संवर्धनासाठी वाचन संस्कृती वाढीस लागणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची आवड निर्माण करण्याचे फार मोठे आव्हान आज आपल्यासमोर उभे आहे. आजच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाच्या व्यतिरिक्त अवांतर वाचन होणे आवश्यक आहे. वाचनामुळे होणारे फायदे , अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना जगण्याचे अनेक संदर्भ मिळतात. त्यांची आकलन शक्ती वाढते.

तसेच इतरांवर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठी अवांतर वाचनाचा उपयोग होत असतो.ग्रंथालय आणि विद्यार्थी यांचे नाते अतूट आहे. पुस्तक विद्यार्थ्यांचे मस्तक संपन्न करत असते.

मोबाईलच्या डंख साखळीमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर काढायचे असेल तर ग्रंथाशिवाय पर्याय नाही. ग्रंथ हेच आपले सर्वांचे गुरू असून ग्रंथाशिवाय तरणोपाय नाही हे आता विद्यार्थ्यांना समजाऊन सांगणे गरजेचे होऊन बसले आहे. "असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.राजाराम निगडे यांनी केले. ते पुढे म्हणाले की,वाचनाच्या माध्यमातून जाणिवा प्रगल्भ होत असतात.भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करावयाचा असेल तर प्रत्येकामध्ये वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे.सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी ग्रंथ हाच रामबाण उपाय आहे.

वाचन हा केवळ छंद नसून ते व्यक्तिमत्व घडविणारे साधन आहे.वाचनामुळे विचारांची खोली वाढते.मन समृद्ध होते.जीवनाला दिशा मिळते.आजच्या माहितीच्या महासागरात योग्य विचारांची दिशा दाखविणारा दीप म्हणजे वाचन होय.विद्यार्थ्यांनी थोडा वेळ पुस्तकासोबत घालवला तर ते नक्कीच जबाबदार नागरिक होऊन जीवनात यशस्वी होतील.डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे आयुष्य हे वाचन ,शिक्षण आणि परिश्रम यांचे उत्तम उदाहरण आहे.त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने वाचनाची सवय जोपासली पाहिजे.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आकर्षणात हरवून जाण्याऐवजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी थोडा वेळ तरी पुस्तकासोबत घालवावा.वाचनातून ज्ञान, विचारशीलता आणि सुसंस्कार यांची जोपासना होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन करताना म्हटले की,विद्यार्थी व प्राध्यापकांनी सुद्धा वाचनाचा संस्कार अंगीकार करून आपले ज्ञान व विचार आणि व्यक्तिमत्व समृद्ध केले पाहिजे.कुठल्याही वाचन संस्कृतीवरून त्या देशाचे भवितव्य ठरत असते. वाचाल तरच वाचाल अशी मिश्किल टिप्पणीही केली.सुरुवातीला कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.अनिलबापू काळदाते यांनी केले.

यावेळी मराठी भाषा व साहित्य विभागप्रमुख डॉ.आशिया चिशती ,डॉ.किसान लोहार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभागाचे प्रा.एन.जे.पवार यांनी मानले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५

## पावसा रे पावसा

पावसा रे पावसा
करू नकोस खोडी
कधी बरसतो सारखा
कधी मारतोस दडी

पावसा रे पावसा
खेळू नकोस लपंडाव
पुरे कर तुझी रिमझिम
खाऊ नकोस भाव

पावसा रे पावसा
अंगणी चिखल फार
कपडे घाणेरडे झाले, की
आईचा बसतो मार

पावसा रे पावसा
अंगणी साचले तळे
नदी, नाले तुडुंब वाहे
तुला कसे नाही कळे ?

पावसा रे पावसा
तू वेडा की खुळा ?
तुझ्या हट्टामुळे
बुडेल माझी शाळा



**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## एकत्र कुटुंब पद्धती

एकत्र कुटुंब पद्धती होती,
मानसे घराची शोभा होती...

लेकरं खेळायचे मनसोक्त अंगणात,
अंगणाला किती श्रीमंती होती...

दारात छान होते वृंदावन,
वृंदावनात तुळस डोलत होती...

परिस्थिती जरी नाजूक होती,
मन मात्र सर्वांची मोठी होती...

नव्हता कुणालाही कशाचा स्वार्थ,
माणसे जिवाला जिवं लावीत
होती...

वडिलधाऱ्यांना होता मानपान,
घराची शिस्त त्यांच्यावर होती...

**प्रशांत काप्रतवार...**
मु. पो. ता. महागांव
जि. यवतमाळ
मो. ९६५७१६४८६३

एम.जे. न्यज चॅनल

## नदी आणि माणूस

ओंजळीत घेऊन पाणी
ओठांना स्पर्श करताना
गहिवरून येते
हरवलेलं बालपण
नदी काठी बसताना
बऱ्याच वर्षांनी
जाऊन भेटावं
माय माऊली नदीला
तिला ही आनंद व्हावा
लेकराला पाणी पाजताना

**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं:- ८८८८६०६०६८

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी विभागीय निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (कृष्णा शिंदे):** जळगाव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय १६ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी छत्रपती संभाजी नगर विभागाच्या संघाचे निवड चाचणी स्पर्धा दिनांक १७/१०/२०२५ रोजी दुपारी ०२.००वाजता विभागीय क्रीडा संकुल गारखेडा संभाजीनगर यांच्या व्हॉलीबॉल मैदानावरआयोजित करण्यात आलेली आहे .

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंची जन्मतारीख १/१/२०१० नंतरचीअसावी .खेळाडूंनी निवड चाचणी स्पर्धेत भाग घेण्यासाठी येताना वयाच्या पुराव्यासाठी आधार कार्ड व शाळेचे बोनाफाईड सादर करावे लागेल .ही निवड चाचणी स्पर्धा संभाजीनगर विभाग अंतर्गत येणाऱ्या हिंगोली .परभणी . जालना व संभाजीनगर येथील खेळाडूसाठी आयोजित करण्यात आलेली आहे .

या निवड चाचणी स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन संभाजीनगर विभागीय सचिव सतीश पाठक . जालना जिल्हा सचिवकाझी आक्रम .परभणी जिल्हा सचिवहिंगोली सचिव नाविद पठाण . संभाजीनगर व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष उमेश शिंदे . प्रवीण शिंदे . प्रफुल कुलकर्णी . सोमनाथ पचलूरे . श्रीमती ज्योती दांडगे . अभिजीत दिख्खत .लोकेश ठाकरे . अभिषेक गणोरकर . जब्बार पठाण . आसिफ पठाण . रोहित पाटील . आशिष शुक्ला .नारायण शिंदे . विलास राजपूत .गणपत पवार व सोमनाथ टाक यांनी केले आहे

संपर्क : -सतीश पाठक ९४२३७४५२५८
जब्बार पठाण ८८०६८४९०२२.

## सुफियान आत्तारचा दमदार वार! जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत सिल्वर मेडलची चमक!



**कन्नड (प्रतिनीधी) :** जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५ अंतर्गत आयोजित तलवारबाजी (Fencing) स्पर्धेमध्ये सुफियान सलीम आत्तार याने उत्कृष्ट कामगिरी करत ईपी (Épée) या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवत (सिल्वर मेडल )पटकावले आहे.

या स्पर्धा संपूर्णतः इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पार पडल्या. स्पर्धेच्या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई सर, राज्य तलवारबाजी संघटनेचे सचिव डॉ. उदय डोंगरे , जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव डॉ. दिनेश वंजारे , जिल्हा क्रीडा मार्गदर्शक तुषार आहेर सर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते स्वप्निल तांगडे , शिवछत्रपती पुरस्कार विजेते सागर मगरे , राष्ट्रीय प्रशिक्षक अजय त्रिभुवन व प्रशिक्षक संतोष अवचार आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रशिक्षक राहुल दणके व शाळेचे क्रीडाशिक्षक विशाल दांडेकर यांनी सुफियानला मोलाचे मार्गदर्शन करून त्याला प्रोत्साहन दिले.सुफियानच्या या यशाबद्दल फातेमा इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य व शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात डॉ. अब्दुल कलाम यांना अभिवादन




**जालना :** भारताचे माजी राष्ट्रपती आणि वैज्ञानिक डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. या निमित्ताने घेण्यात आलेल्या पुस्तक परीक्षण या स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.प्रथम क्रमांक वैशाली मिल, द्वितीय क्रमांक ऐश्वर्या चव्हाण, तृतीय क्रमांक समीक्षा कुलकर्णीयांना प्राप्त झाले. यावेळी पोस्टर प्रेसेंटेशन शेख साजिया आणि राय मानसी यांनी केले. स्पर्धेचे मूल्यांकन प्रा. राजक्रांती वलसे आणि प्रा. प्रियदर्शन भवरे यांनी केले.यावेळी वैशाली मिल या विद्यार्थिनीने अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर भाष्य केले. कोणत्याही प्रकारची पार्श्वभूमी नसताना ज्ञानाच्या बळावर आणि हिमतीवर अब्दुल कलाम यांनी आपल्या देशाला मोठे योगदान दिले आहे. मिसाईल मॅन म्हणून त्यांना सारे जग ओळखते. लोकांचा राष्ट्रपती म्हणून त्यांना संबोधल्या जाते. साधी राहणी उच्च विचारसरणी असे त्यांचे आयुष्य होते. क्षेपणास्त्राच्या क्षेत्रात आपल्या देशाचे नाव त्यांनी उंचीवर नेले होते. सर्वसामान्यांमध्ये सहज मिसळणारे अब्दुल कलाम सर्वांना प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते. शुद्ध चारित्र्य आणि प्रामाणिक प्रयत्न याद्वारे आपण देशाला मोठे योगदान देऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिले. अब्दुल कलाम आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत आहे असे ती म्हणाली.यावेळी विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या भित्तिपत्रकांचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण कुंभार यांनी केले. याप्रसंगी डॉ. प्रवीण कोकणे, डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. पवन देशमुख, प्रा. अभिजीत भुतेकर, डॉ. रामेश्वर मस्के, प्रा. वर्षा वानखेडे, प्रा. राहुल वाकडे, विजय लोणकर, राम हिवरेकर, अजय जोशी, अश्विनी पठाडे, ज्योती धांडे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.


महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५

# भुकेविरुद्धचा लढा आणि शाश्वत अन्नसुरक्षा : जागतिक अन्न दिनाचे सामाजिक भान

दरवर्षी १६ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. १९४५ साली १६ ऑक्टोबर रोजी कॅनडा येथील क्वेबेक सिटी येथे ४२ देशांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेची (Food and Agriculture Organization — FAO) स्थापना केली. त्यामुळेच हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून साजरा केला जातो." जागतिक अन्न दिन हा केवळ एका संस्थेचा वर्धापनदिन नसून तो जगाच्या सर्वात मोठ्या आणि गंभीर समस्यांपैकी एक असलेल्या भूक, कुपोषण, दारिद्र्य आणि अन्न वितरणातील असमानता या विषयांवरील सामाजिक जागृतीचा दिवस आहे. या दिनाचे मूळ उद्दिष्ट म्हणजे जगातील प्रत्येक व्यक्तीला पौष्टिक, सुरक्षित आणि पुरेसे अन्न मिळावे यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर प्रयत्नांना चालना देणे हे आहे.आजच्या घडीला जगात अन्न उत्पादन वाढले असले तरी भूक आणि कुपोषणाची समस्या चिंताजनक स्वरूपात कायम आहे. FAO च्या The State of Food Security and Nutrition in the World (SOFI) 2025 या अहवालानुसार, २०२४ साली जगभर सुमारे ६३८ ते ७२० दशलक्ष लोकांना (म्हणजेच अंदाजे ६३ ते ७२ कोटी लोकांना) पुरेसे अन्न मिळत नाही. तसेच सुमारे २ अब्ज लोकांना पौष्टिक आणि सुरक्षित अन्नाची कमतरता भासते, तर जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे ८.२ टक्के लोक अजूनही भुकेशी झगडत आहेत. FAO आणि World Food Programme (WFP) च्या संयुक्त अहवालानुसार, वाढती अन्नमूल्यवाढ, हवामान बदल, सशस्त्र संघर्ष, आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील असमानता यांमुळे अनेक देशांतील अन्नसुरक्षेवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'जागतिक अन्न दिन' दरवर्षी विविध विषयांवर जनजागृती निर्माण करतो. २०२५ साली या दिनाची अधिकृत थीम FAO ने 'Hand in Hand for Better Foods and a Better Future' अशी निश्चित केली आहे. या थीमद्वारे जगभरातील देश, संस्था आणि व्यक्तींनी एकत्र येऊन अधिक पौष्टिक, टिकाऊ आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करावी, असा संदेश देण्यात आला आहे.अन्न हे मानवाच्या अस्तित्वाचे मूळ तत्त्व आहे. परंतु आज जगात अन्नाची निर्मिती, साठवण, वितरण आणि उपभोग या सर्व प्रक्रियांमध्ये प्रचंड असमानता आहे. विकसित देशांमध्ये अन्नाची नासाडी तर विकसनशील देशांमध्ये भुकेची तीव्रता दिसून येते. भारतासारख्या कृषीप्रधान देशात अन्नउत्पादनाचा भव्य इतिहास असूनही भुकेचा शाप अजूनही लाखो लोकांच्या जीवनाला वेढून बसलेला आहे. देशातील प्रत्येकाला पुरेसे व पौष्टिक अन्न मिळावे ही बाब अजूनही आव्हानात्मक आहे. Global Hunger Index 2024 नुसार भारताला १२७ देशांपैकी १०५ वे स्थान प्राप्त झाले आहे आणि त्याला 'गंभीर' (Serious) श्रेणीत वर्गीकृत करण्यात आले आहे. हा क्रमांक दक्षिण आशियातील इतर देशांपेक्षा खालचा आहे, जसे की नेपाळ (६९), श्रीलंका (६५), बांगलादेश (८१) आणि पाकिस्तान (१०२). अहवालानुसार भारतातील सुमारे १३.७ टक्के लोकसंख्या अंडरन्युरिश्ड आहे, म्हणजेच त्यांना दररोज आवश्यक असलेले कॅलरी मूल्य मिळत नाही. विशेषतः बालकांच्या आरोग्याच्या संदर्भात परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. देशातील ५ वर्षांखालील सुमारे ३५.५ टक्के मुले स्टंटिंग (उंची कमी असणे) तर १८.७ टक्के मुले वेस्टिंग (वजन कमी असणे) या पोषणअभावाशी संबंधित समस्यांनी ग्रस्त आहेत.या आकडेवारीतून स्पष्ट होते की भारतात भूक आणि कुपोषण ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक असमानतेशी घट्ट निगडित आहे. ग्रामीण भागात रोजगाराची अस्थिरता, महिलांच्या पोषणाबाबतची दुर्लक्षाची वृत्ती, अन्नधान्य वितरणातील त्रुटी, तसेच शहरी झोपडपट्ट्यांतील अस्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे अन्नसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. यावर उपाय म्हणून 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना', 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३' (NFSA), आणि 'मिड-डे मील योजना'सारख्या उपक्रमांनी काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरीही त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज तीव्रतेने जाणवते. अन्नसुरक्षा केवळ धान्य वितरणाच्या मर्यादेत न पाहता ती पोषण, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या सर्व अंगांनी समजून घेणे आवश्यक आहे. कारण भूक ही मानवी विकासातील सर्वात मोठी अडथळा आहे, आणि जोपर्यंत प्रत्येक भारतीयाला पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळणार नाही, तोपर्यंत 'विकसित भारत' हे स्वप्न अपूर्णच राहील.जागतिक पातळीवर 'भूक' ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्नही आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जमीन आणि पाणी यांसारख्या नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण पडत आहे. हवामान बदलामुळे शेतीचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. दीर्घकालीन दुष्काळ, अनियमित पाऊस, पूर, जमिनीची धूप, रासायनिक खतांमुळे झालेली मातीची हानी हे सर्व घटक अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम घडवत आहेत. परिणामी शेतीतील उत्पादन कमी होते आणि अन्नधान्याचे दर वाढतात. शाश्वत अन्न प्रणाली (Sustainable Food Systems) हा आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. केवळ उत्पादन वाढवणे हे एकमेव उत्तर नाही, तर उत्पादन, वितरण, उपभोग आणि नासाडी कमी करणे या सर्व पायऱ्यांवर लक्ष देणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी (SDGs) दुसरे उद्दिष्ट "Zero Hunger by 2030" म्हणजेच "२०३० पर्यंत भुकेचा अंत" हे आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करायचे असल्यास कृषी क्षेत्रात वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर, सिंचनाचे आधुनिकीकरण, पाण्याचा कार्यक्षम वापर, जैविक शेती, स्थानिक पिकांचे संवर्धन, तसेच अन्न साखळीत महिलांचा सहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे.महिलांची भूमिका अन्नसुरक्षेत अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात स्त्रिया शेतीपासून ते अन्न साठवणूक आणि स्वयंपाकापर्यंत सर्व कामात हातभार लावतात. मात्र त्यांना आर्थिक निर्णयप्रक्रियेत स्थान मिळत नाही. त्यामुळे महिलांना कृषी प्रशिक्षण, बियाणे व खतांची सुलभ उपलब्धता, तसेच बाजारपेठेतील न्याय्य दर मिळावा यासाठी शासनाने ठोस धोरणे आखली पाहिजेत. अन्न ही केवळ भूक भागवणारी गोष्ट नसून ती संस्कृती, ओळख आणि समाजजीवनाचा अविभाज्य भाग आहे. भारतीय समाजात अन्नाला 'अन्नपूर्णा'चे रूप दिले गेले आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे अन्नाच्या उपभोगात आणि मूल्यांमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. फास्ट फूड, जंक फूड, प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ यांचा वाढता वापर आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. स्थूलता, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा 'जीवनशैलीजन्य आजारां'चे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे 'आरोग्यदायी अन्न संस्कृती' विकसित करणे हा देखील जागतिक अन्न दिनाचा एक महत्त्वाचा संदेश आहे. पोषण आणि सुरक्षित अन्न हे मानवाधिकाराशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार जाहीरनाम्यातील कलम २५ नुसार, प्रत्येक व्यक्तीस आपले आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक अन्न मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. म्हणूनच सरकार, उद्योग, समाजसंस्था आणि सामान्य नागरिक यांना एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.भारतामध्ये आज अन्नधान्याचे उत्पादन वाढले असले तरी त्याचे समान वितरण आणि साठवणूक व्यवस्थापन हे अद्यापही आव्हानात्मक आहे. दरवर्षी लाखो टन धान्य अयोग्य साठवणुकीमुळे वाया जाते. भारतीय अन्न महामंडळ (FCI) च्या अहवालानुसार, सुमारे १० टक्के पर्यंत धान्य उंदीर, आर्द्रता आणि साठवणूक अभावामुळे नष्ट होऊ शकते. ही अन्ननासाडी टाळण्यासाठी आधुनिक शीतगृह आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे जाळे मजबूत करणे गरजेचे आहे. भुकेचा प्रश्न हा फक्त 'अन्न नसल्याचा' नाही तर 'अन्नाचा गैरवाटप' आणि 'अन्नविषयक धोरणांची असमान अंमलबजावणी' यांचाही आहे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, पुरुष आणि महिला यांच्यातील अन्नसुरक्षेतील अंतर कमी करणे हा सर्वात मोठा सामाजिक उद्देश असायला हवा.जागतिक अन्न दिन हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण किती अन्न वाचवतो, किती नासवतो, आणि किती वाटतो याचा विचार करण्याचा दिवस आहे. आपण 'अन्न दान' आणि 'अन्न संवर्धन' या दोन्ही संकल्पना जीवनात उतरविल्या तरच जागतिक भूकमुक्तीचा स्वप्न साकार होईल. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक शासन यंत्रणा यांनी अन्नबचतीबाबत जनजागृती मोहिमा राबवाव्यात. अन्न हे जीवन आहे, अन्न हे आरोग्य आहे, आणि अन्न हे मानवतेचे प्रतीक आहे. म्हणूनच, 'अन्नाचा सन्मान करा, अन्नाची नासाडी टाळा आणि अन्नाचे समान वाटप करा' हा संदेश प्रत्येक नागरिकाच्या कृतीतून प्रतिबिंबित झाला पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करण्यासाठी आज आपण पावले उचलली पाहिजेत. भुकेविरुद्धचा हा लढा केवळ शासनाचा नाही, तर प्रत्येक मानवाचा आहे. कारण भूक कोणालाही विचारत नाही, ती फक्त जाणवते, आणि त्या जाणिवेतूनच जागतिक अन्न दिनाचा खरा अर्थ प्रकट होतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)***
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
ईमेल –
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५

# महाराष्ट्रातील माहिती अधिकाराची वाटचाल आणि सद्य:स्थिती

आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये जनतेपासून शासन व्यवस्थेचे मूल्यमापन होणे लोकशाहीमध्ये अपेक्षित आहे. म्हणून शासन व प्रशासनाची कार्यपद्धती याविषयी जनतेला माहिती असणे गरजेचे आहे. कारण माहिती ही प्रत्येक राष्ट्रातील नागरिकांच्या हातात असलेले एक चलन आहे. नागरिक जेवढे जास्त माहिती बाबत सजग असतील तेवढेच ते समुदायाच्या गरजा आणि शासन यांना प्रत्यक्षपणे जबाबदार असतील. त्याचे कारण म्हणजे जर शासनाने घेतलेली निर्णय हे समाजासाठी कितपत योग्य आहेत हे समजण्यासाठी त्यांना माहितीची आवश्यकता असते जर व्यक्तीला माहितीचे ज्ञानच नसेल तर व्यक्ती तिच्या अधिकाराचा आणि कर्तव्याचा एक जबाबदार नागरिक म्हणून राष्ट्राला कोणताही हातभार लावू शकत नाही. त्यामुळे माहितीही सामान्य जनतेला मिळणे आवश्यक आहे. कारण माहितीवर प्रक्रिया केली तर ज्ञानातून संपत्तीची निर्मिती करता येते हा या युगाचा संदेश आहे. लोकशाही विकेंद्रीत, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याची शक्ती माहिती मध्ये आहे. परंतु तसा त्याचा उपयोग करून घेता आला पाहिजे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये माहिती अधिकाराचे स्वातंत्र्य हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय विकासाबाबत मैलाचा दगड ठरत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारातील कलम १९ (१) अंतर्गत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आधारित असा हा कायदा आहे. आणि तो वारसा हक्काने प्राप्त न होता कायद्यानेच तो प्राप्त झाला आहे. प्रत्येक राष्ट्राच्या सुशासनासाठी माहितीचा अधिकार कायद्याचे अस्तित्व महत्त्वाचे ठरत आहे. भारतासारख्या लोकशाही प्रधान राष्ट्रात माहितीचा अधिकार हा व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराचा हा पायाच झाला असून लोकशाही प्रधान राष्ट्रांमध्ये माहितीचा अधिकार कायदा शासन व प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित करणारा असा महत्त्वपूर्ण कायदा आहे. माध्यम (मीडिया) कायदेमंडळ, न्याय मंडळ याहीपेक्षा जनतेला माहितीचा अधिकार महत्त्वाचा आहे कारण माध्यम, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ हे कोणत्याही पद्धतीने माहिती पुन्हा मागू शकते, पाहू शकते परंतु एक सामान्य व्यक्ती माहिती मिळवू व पाहू शकत नाही. म्हणून माहितीचा अधिकार कायदा हा जनसामान्यांना मिळालेला एक मुलभूत अधिकार आहे.

**माहिती अधिकाराची उपयुक्तता :**

आजचे युग हे माहितीचे युग म्हणून ओळखले जाते या युगात माहितीच्या अधिकाराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. कारण आज जगातील अनेक देशांमध्ये माहिती अधिकाराच्या उपयुक्ततेची जाणीव झाली आहे. आज भारतासारख्या लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही शासन व्यवस्थेत माहिती अधिकाराची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढतच आहे. माहितीच्या अधिकार कायद्यामुळे समाजात व प्रशासकीय यंत्रणेत पारदर्शकता येत आहे. पूर्वी प्रशासकीय कार्य हे बंदिस्त व गोपनीय असायची आज प्रत्येक राजकीय व प्रशासकीय यंत्रणेत माहितीच्या अधिकारामुळे प्रशासकीय राजकीय व्यवस्था व जनता यात एकमेकांबद्दल विश्वासहार्यता निर्माण झाली आहे. अधिकारी व कर्मचारी हे शासन आणि प्रशासनामध्ये काय करीत आहेत याची माहिती प्रत्येक नागरिकाला या कायद्यामुळे होऊ लागली. यामुळे प्रशासन खुले पारदर्शक होऊन भ्रष्टाचाराला आळा बसत आहे. तसेच या कायद्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाली आहे. पूर्वी एखादी माहिती सामान्य व्यक्ती मागत असेल तर ती त्याला पुरवली जात नव्हती परंतु या कायद्यामुळे ती माहिती पुरवणे बंधनकारक झाले. यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.

संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क प्रदान केले आहेत त्या अधिकाराची जाणीव ही त्या नागरिकाला माहितीच्या अधिकारामुळे होऊ लागली आहे. जोपर्यंत आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होत नाही तोपर्यंत आपले हक्क अधिकार मिळत नाहीत माहितीच्या अधिकारामुळे जनतेचे सबलीकरण होऊन नागरिक सुजाण बनत आहेत. तसेच भ्रष्टाचार रोखण्यासाठी, प्रशासन आणि जनता यांच्यातील संबंध सुधारण्यासाठी, नागरी स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी, गरीब श्रीमंत यांच्यातील दरी कमी करण्यासाठी, प्रसार माध्यमाना प्रभावी बनवण्यासाठी, शासनाच्या योजना व धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे इत्यादीसाठी माहितीचा अधिकार अधिक उपयुक्त ठरत आहे.

**महाराष्ट्र आणि माहितीचा अधिकार :**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अमलात आल्यानंतर सलग २० व्या वर्षीही माहिती मागणीचे अर्ज, प्रथम आपले, व राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील यांचे प्रमाण वाढत आहे. या कायद्याबाबत विविध व्यक्ती संस्था संघटना कडून होत असलेला प्रसार व प्रचार, सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्याबाबतची वाढती जागृती आणि अर्ज व अपीले याद्वारे प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपलब्ध होणारी माहिती यामुळे या कायद्याच्या वापराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते. या कायद्याच्या अंमलबजावणी मध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४ ची अंमलबजावणी पारदर्शकतेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. परंतु कायद्यात सांगितल्या प्रमाणे १२० दिवसाची मुदत उलटून किती तरी कालावधी गेला तरी अद्याप काही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये या कलमाची पूर्ण अंशाने अंमलबजावणी झालेली नाही. या कलमाची पूर्णतः अंमलबजावणी झाल्यास माहिती अर्जाचे, अपीलाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल व खऱ्या अर्थाने या अधिनियमानुसार अपेक्षित असलेला पारदर्शीपणा शासकीय कामकाजात दिसून येईल.

**महाराष्ट्रातील माहिती अधिकाराची सद्य:स्थिती:**

महाराष्ट्र भारतातील एक प्रगत आणि पुरोगामी राज्य समजले जाते. इतिहासामध्ये महाराष्ट्रातल्या पुरोगामी परंपरेचे दाखले जागोजागी आढळतात. माहितीच्या अधिकाराचा केंद्रीय कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीच महाराष्ट्राने राज्य पातळीवर माहितीच्या अधिकाराचा कायदा तयार केला होता आणि या कायद्याच्या महाराष्ट्रातील नागरिकांनी चांगला उपयोग देखील सुरू केला होता हा कायदा सप्टेंबर २००३ पासून राज्यात लागू झाला होता आणि तेव्हापासून केंद्रीय कायदा येईपर्यंत म्हणजे सुमारे दोन वर्षात तब्बल ३३००० अर्ज माहिती अधिकाराअंतर्गत करण्यात आले. त्यापैकी सुमारे ८०० अर्जदारांनी अपील केले म्हणजे ३२,२०० अर्जदारांना माहितीचा पुरवठा झाला. एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्यामध्ये माहितीच्या अधिकाराचे अर्ज प्राप्त झाले. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील नागरिक हे राज्य पातळीवरच्या माहिती अधिकार कायद्याचा वापर अधिक केल्याचे दिसून येते.

**सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकाराचे प्राप्त अर्ज:**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अंतर्गत नागरिकांनी माहिती मिळण्यासाठी राज्यातील सार्वजनिक प्राधिकरणांकडे एकूण ८,६०,६४१ एवढे माहिती अर्ज केले. तसेच, सन २०२२ या वर्ष अखेरीस सुधारित आकडेवारीनुसार ७१,१७३ अर्ज प्रलंबित होते. अशा प्रकारे एकूण ९,३१,८१४ अर्जावर सन २०२३ मध्ये माहिती देणे अपेक्षित होते. त्यापैकी, सुमारे ८,५५,६६१ इतके अर्ज सन २०२३ या साली निकालात काढण्यात आले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अंतर्गत राज्यातील नागरिकांकडून दाखल होणाऱ्या अर्जांची आकडेवारी पाहता, सन २००६ मध्ये केवळ १,२३,००० अर्ज दाखल झाले होते. एकूण कालावधीत दाखल झालेल्या १,१४,६९,०१३ अर्जांपैकी ही संख्या फक्त १.०७% इतकी होती. पुढील वर्षी २००७ मध्ये अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढून ३.१६ लाख झाली, जी एकूण संख्येच्या २.७५% इतकी आहे.

सन २००८ मध्ये ४.१६ लाख (३.६३%) आणि सन २००९ मध्ये ४.४० लाख (३.८४%) या वर्षांतही सातत्याने वाढ दिसून येते. २०१० मध्ये अर्जांची संख्या ५.४८ लाख झाली, जी एकूण संख्येच्या ४.७८% इतकी आहे. सन २०११ मध्ये ६.४५ लाख (५.६२%) व २०१२ मध्ये ६.८२ लाख (५.९५%) एवढी वाढ होत राहिली. २०१३ मध्ये अर्जांची संख्या ७.५१ लाखांवर पोहोचली, जी संपूर्ण कालावधीतल्या एकूण अर्जांपैकी ६.५५% आहे.

तसेच सन २०१४ अर्जाच्या संखेमध्ये थोडी घट होऊन ७.०३ लाख (६.१३%) अर्ज झाले. २०१५ मध्ये मात्र पुन्हा मोठी वाढ होऊन ८.६८ लाख अर्ज दाखल झाले, जे एकूण संख्येच्या ७.५७% इतके आहेत. पुढे सन २०१६ मध्ये ६.८४ लाख (५.९६%) व सन २०१७ मध्ये ७.५७ लाख (६.६०%) मध्ये काही प्रमाणात स्थिरता दिसून येते. विशेष म्हणजे, सन २०१८ मध्ये सर्वाधिक म्हणजे ९.२५ लाख अर्ज प्राप्त झाले, जे एकूण संख्येच्या ८.०७% आहेत.

सन २०१९ मध्ये ही संख्या घसरून ७.५७ लाख (६.६०%) इतकी झाली. कोविड-१९ महामारीमुळे २०२० मध्ये अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटली व ती फक्त ५.०७ लाखांवर आली, जी एकूण संख्येच्या ४.४२% आहे. मात्र, त्यानंतरच्या काळात म्हणजे सन २०२१ मध्ये ७.१३ लाख (६.२१%), तसेच सन २०२२ मध्ये ७.६८ लाख (६.७०%) व सन २०२३ मध्ये ८.६० लाख (७.५०%) मध्ये पुन्हा वाढ झाल्याचे दिसते.

संपूर्ण कालावधी (सन २००६-२०२३) मधील एकूण अर्जांची संख्या १ कोटी १४ लाख ६९ हजार १३ आहे. या पैकी सर्वाधिक अर्ज सन २०१८ मध्ये (८.०७%) तर सर्वात कमी अर्ज सन २००६ मध्ये (१.०७%) प्राप्त झाले. या तुलनात्मक विश्लेषणावरून स्पष्ट होते की, माहितीचा अधिकार कायदा हळूहळू समाजात रूजत आहे. या आकडेवारीवरून माहितीचा अधिकार हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आज लोकशाहीतील पारदर्शकता, जबाबदारी व उत्तरदायित्व वाढविणारा प्रभावी कायदा ठरत आहे. म्हणजेच याचा अर्थ या कायद्यामुळे नागरिक सजग होऊन जनसामान्यांमध्ये या कायद्याचा प्रचार व प्रसार होत असल्याचे सिद्ध होते. असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे प्रकरणे (अपील) प्रलंबित आहेत. शासकीय यंत्रणा माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती नाकारू लागली तर ती माहिती देण्यास शासकीय यंत्रणेला भाग पाडण्याचे काम राज्य माहिती आयोग करीत असतात, परंतु येथेही दिरंगाईचे चित्र दिसून येते. या दिरंगाईमुळे शासन व प्रशासनात भ्रष्टाचारास वाव मिळू शकते. यासाठी राज्य माहिती आयोगातील रिक्त असलेली पदे पूर्णपणे भरून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे व वेळेच्या वेळेत प्रकरणी निकाली काढले तर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर या कायद्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. यातून प्रशासकीय पारदर्शकता, तत्परता आणि गतिशीलता येऊन प्रशासन हे जनताभिमुख होण्यास वेळ लागणार नाही.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून भारतासारख्या देशांमध्ये माहिती प्राप्त करून ज्ञानवृद्धी करता येते. त्याच ज्ञानातून संपत्तीची निर्मिती करता येते. म्हणजेच माहिती व ज्ञान लोकांच्या एकंदरीत विकासातील अडथळे व अडचणी दूर करताना आढळून आले. माहिती अधिकार कायद्यामुळे पारदर्शकता, खुलेपणा, प्रशासकीय कार्यक्षमता, उत्तरदायित्व आणि भ्रष्टाचार विरहित प्रशासनाची निर्मिती होत आहे. तसेच जनतेचे प्रशासनात सहभाग वाढवणे व प्रसार माध्यमांना प्रभावी बनवण्याचा हा कायदा उपयुक्त असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिक लोकशाहीतील खरे मालक बनत आहेत. यातून लोकशाही बळकट होऊन सजग नागरिक तयार होत आहेत. शासन व प्रशासनावरील नियंत्रण ठेवणारा असा एकमेव कायदा असल्याचे सिद्ध झाले. तसेच विविध विकास कामांना चालना मिळत आहे. विशेषता ग्रामीण भागातील विकासाची कामे जलद गतीने होत आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीतून प्रशासनात होणाऱ्या भ्रष्टाचारास आळा बसत आहे.

माहिती अधिकार कायद्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती मिळत आहे. त्याचबरोबर या कायद्यानुसार प्राधिकरणाची माहिती ही त्यांच्या संकेतस्थळावरून मिळवता येऊ लागली आहे. म्हणून आज जगामध्ये सुशासन संकल्पनेचा आधार म्हणून ई-गव्हर्नन्सचा उपयोग होत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून एक नवीन व सफलता पूर्वक कार्य करणारी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील माहिती अधिकाराची अंमलबजावणीमुळे आपिले, तक्रारी याचा निपटारा करण्यासाठी राज्य माहिती आयोग महत्त्वाची भूमिका बजावते, परंतु या आयोगातील एकूण पदापैकी ६५ टक्के पदे अद्यापही रिक्त असल्यामुळे अर्जाचे व तक्रारीचे निवारण वेळेवर होत नाहीत असे दिसून येते. यामुळे राज्य माहिती आयोगातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे पूर्णतः भरणे आवश्यक आहे. तरच आयोगाकडे प्रलंबित असलेल्या कार्याचा निपटारा वेळेत करणे शक्य होईल.

**माहिती अधिकाराच्या सक्षमीकरणासाठी**

माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी या कायद्याची जनजागृती करणे महत्वाचे आहे. शाळा, महाविद्यालये, तसेच समाजात व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, वादविवाद, वक्तृत्व व निबंध स्पर्धा यांसारख्या उपक्रमांद्वारे कायद्याचा प्रचार-प्रसार झाला पाहिजे. तसेच, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देऊन पारदर्शकतेची शपथ दिली तर लोकशाही मूल्यांचा अधिक दृढ पाया निर्माण होईल. याचबरोबर सर्व राजकीय पक्षांनाही माहिती अधिकाराच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे.

सार्वजनिक प्राधिकरणांच्या संकेतस्थळांवर कलम ४ अंतर्गत नमूद केलेली माहिती नियमित अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. द्वितीय अपील वेळेत आणि तातडीच्या प्रकरणांमध्ये ऑनलाईन घेणे ही गरज आहे. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये राज्यातील सर्वच प्राधिकरणांचा समावेश करणेही अत्यावश्यक आहे. तसेच, राज्य माहिती आयोगातील रिक्त पदे तातडीने भरणे व विधी अधिकारी आणि आय.टी. प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

माहिती मागणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी, विशेषतः संवेदनशील माहितीच्या बाबतीत, पोलिस संरक्षण उपलब्ध करून देणे योग्य ठरेल. माहिती अर्जावर आधार क्रमांकाची नोंद अनिवार्य केल्यास माहितीचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींची शहानिशा होऊ शकते. याचबरोबर शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांना प्रशिक्षण देणे हे माहिती अधिकाराच्या संस्कृतीला बळकटी देणारे पाऊल ठरेल. नागरिकाना माहितीचा अर्ज करण्याच्या प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी प्रत्येक राज्यात मोफत कॉल सेंटर असणेही उपयुक्त ठरेल.

माहिती अधिकाऱ्यांना त्रास देणाऱ्या अर्जदारांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकल्यास कायद्याचा दुरुपयोग रोखता येईल. अभिलेख व्यवस्थापनावर कार्यशाळा घेऊन अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणेही महत्त्वाचे आहे. कलम ७(३)(क) नुसार माहिती शुल्क वेळेत कळविण्यासंबंधीचे स्पष्ट निर्देश असावेत. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभत्ता देऊन त्यांना प्रोत्साहित करता येईल. शेवटी, कलम ४(१) ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी त्रयस्थ संस्थेद्वारे पारदर्शक अंकेक्षण केल्यास सर्व सार्वजनिक प्राधिकरणे आपले संकेतस्थळे अद्ययावत ठेवतील परिणामी प्रशासनातील पारदर्शकता वाढेल.



**डॉ. सुनील लक्ष्मण गावंडे**
नाशिक
मोबाईल : ९७६७७०४२५०
ई- मेल:
drsunilgawande14@gmail.com